सपनों का पूरा होना और कामयाब होना, तभी संभव है जब हम अपने काम में एकाग्र रहते हैं और सही दिशा में आगे बढ़ते हैं।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २३ जानेवारी २०२५ | अंक४५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ९१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# आगीच्या अफवेनं घेतला अनेक प्रवाशांचा बळी!

# जळगावमध्ये भीषण रेल्वे दुर्घटना, नेमकं काय घडलं?

## प्रवाशानं काय सांगितलं?

या रेल्वेमधून प्रवास करणा-्या एका प्रवाशानं अपघाताबाबत माहिती देताना म्हटलं की, ही घटना दुपारी साडेतीन ते चारच्या दरम्यान घडली. आग लागल्याची अफवा पसरली, त्यानंतर काही जणांनी ट्रेनमधून उड्या मारल्या. त्याचदरम्यान समोरून बंगळूरू एक्स्प्रेस येत होती. या एक्स्प्रेसने ३० ते ३५ जणांना चिरडल्याची घटना घडली. यात अनेक जण जखमी झाले आहेत. तर काही जणांचा मृत्यू देखील झाला आहे.दरम्यान समोरून येणा-या बंगळूरू एक्स्प्रेसने हॉर्न देखील दिला नाही असा दावा देखील काही प्रत्यक्षदर्शींकडून करण्यात आला आहे. हॉर्न दिला असता तर कादाचित प्रवाशी सावध झाले असते, असंही म्हटलं जात आहे, सध्या पुष्पक एक्स्प्रेसला पाचोरा रेल्वे स्थानकात आणण्यात आलं आहे.



जळगाव येथील पाचोरा जवळील परधाडे रेल्वे स्थानकानजिक भीषण अपघाताने खळबळ उडाली आहे. पुष्पक एक्सप्रेसने अचानक ब्रेक दाबल्याने चाकांच्या घर्षणामुळे धूर आल्याने आग लागल्याची अफवा पसरुन पुष्पक एक्सप्रेसमधून प्रवासी रुळांवर उतरले असताना दुस-या दिशेने आलेल्या कर्नाटक एक्सप्रेसने रेल्वे प्रवाशांना चिरडल्याने सात ते आठ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स माध्यमावर पोस्ट केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात एक्सवर ( आधीचे ट्वीटर) पोस्ट केली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. माझे सहकारी मंत्री गिरीश महाजन तसेच पोलिस अधीक्षक हे घटनास्थळी पोहोचले असून, जिल्हाधिकारी काही वेळात तेथे पोहोचत आहेत. संपूर्ण जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाशी समन्वयाने काम करीत असून जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. ८ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसेच नजीकच्या इतर खाजगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे.

## मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी विजय वडेट्टीवार

जळगावजवळ पाचोरा येथे पुष्पक एक्स्प्रेस मधील प्रवाशांनी भीतीने गाडीतून उड्या मारल्याने समोरून येणा-्या ट्रेनने धडक दिल्याने भीषण अपघात झाला झाल्याची दुर्दैवी घटना मन सुन्न करणारी आहे. या दुर्दैवी घटनेत आतापर्यंत आठ प्रवाशांचा मृत्यू झाला असून १२ प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. या अपघाताने अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दुर्घटनेतील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. जखमी प्रवाश्यांना उपचारासाठी आवश्यक सर्व सुविधा सरकारने तातडीने उपलब्ध करून द्यावे. तसेच मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी.रेल्वे प्रशासनाने या घटनेची चौकशी करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य ती पावले उचलावी असे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

## बावनकुळे बीडमध्ये महसुल विभागाचा घेणार आढावा



बीड । प्रतिनिधी राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे पदभार स्विकारल्यानंतर पहिल्यांदाच बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून दि.२४ जानेवारी (शुक्रवार) रोजी बीडमध्ये येत असून ते महसुल विभागाचा आढावा घेणार आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसुल मंत्री पदाचा जबाबदारी स्विकारल्यानंतर कामकाजाचा धडाका लावला असून ते आज छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालयात विभागाची आढावा बैठक घेत आहेत. भुसंपादनाची प्रकरणे, रिक्त जागा, वर्ग १ वर्ग २ च्या अधिकाऱ्यांची जागा यासह अनेक प्रश्नांचा आढावा या बैठकीत घेणार आहेत. त्यामुळे बीडचे महसुल विभागही या बैठकीच्या अनुषंगाने माहिती गोळा करत आहे. प्रशासनाने त्यांच्या बैठकीची तयारी केलेली आहे.

## धाकटी ब्रह्मगिरी श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण येथे प्रदक्षिणा सोहळा

### ५०,००० भाविक उपस्थित राहण्याची शक्यता

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील प्रसिद्ध अशा श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा पौष वद्य षट्तिला एकादशी दि.२५ जानेवारी २०२५ वार शनिवार रोजी संपन्न होत आहे. संस्थानचे महंत महाराष्ट्रातील एक नामांकित कीर्तनकार भागवताचार्य श्री ह.भ.प.प.पू.गु. श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या कल्पक व आचारशुद्ध नेतृत्वामुळे हे संस्थान अल्प कालावधीत नावारुपाला आले आहे.यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थानचा फार मोठा विकास झाला आहे.गेल्या दहा वर्षांपासून या तीर्थक्षेत्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत ब्रह्मगिरी प्रदक्षिणा होत आहे.गत वर्षी ५०,००० पेक्षा अधिक भाविकांनी प्रदक्षिणा केली होती.बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील भाविक मोठ्या संख्येने प्रदक्षिणेत सहभागी होतात. हिंदू धर्मात ब्रह्मगिरी प्रदक्षिणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.महाराष्ट्रात श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा केली जाते.येथेही भगवान त्र्यंबकेश्वरांचे भव्यदिव्य मंदिर महंत श्री डोंगरे महाराज यांनी बांधले आहे.येथे त्रेतायुगात महर्षी गौतम ऋषी यांनी तप केले आहे.हे तीर्थक्षेत्र धाकटी ब्रह्मगिरी म्हणून प्रसिद्धीस आले आहे.बीड जिल्ह्याचे श्रद्धास्थान श्री क्षेत्र नारायण गडाच्या परंपरेतील हे तीर्थक्षेत्र आहे.



नारायणगडाचे महंत वै.ह.भ.प.गु.माणिक बाबा यांना येथे गौतम ऋषींचा साक्षात्कार झाला.पुढे महंत वै.ह.भ.प.पू.गु.महादेव महाराज यांनी या संस्थानचा विकास करण्याचा संकल्प केला नंतर श्री क्षेत्र नारायण गडाचे विद्यमान महंत श्री ह.भ.प.प.पू.गुरुवर्य शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आता मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू आहे. प्रदक्षिणेच्या दिवशी पंचक्रोशीतील अनेक गावांतून भव्यदिव्य दिंड्या सहभागी होतात.मराठवाड्यातील सर्व भाविकांनी प्रदक्षिणा सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थानचे महंत श्री ह.भ.प.गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांनी केले आहे.

## ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट देत श्री संत गजानन महाविद्यालयाची शै. सहल संपन्न




खर्डा ( प्रतिनिधी )येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा. भूगोल विभागाच्या वतीने सहलीचे आयोजन करण्यात आले होते.यादरम्यान पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, सिंधुदुर्ग किल्ला, तारकरली बीच, मालवण, कुडाळ, आदमापुर येथील बाळूमामाचे मंदिर, कोल्हापूर येथील शाहू पॅलेस, अंबाबाई देवी मंदिर, ऐतिहासिक रंकाळा तलाव, कृष्णा- पंचगंगा नदीचा संगम असलेले व श्री दत्ताचे जागृत ठिकाण असलेले नरसोबाचीवाडी विविध ऐतिहासिक, धार्मिक व नैसर्गिक पर्यटन स्थळांना भेट देत क्षेत्र अभ्यास करण्यात आला. सहलीच्या माध्यमातून नैसर्गिक घटकांचे अवलोकन करून निसर्गाची नवनिर्मिती सर्वांना माहीत व्हावी, निसर्गाचा अगदी जवळून अनुभव घेता यावा हा यामागील महत्त्वाचा उद्देश्य होता. याप्रसंगी महाविद्यालयातील एकूण ४७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या सहलीमध्ये सहल प्रमुख प्रा. डॉ. शिवानंद जाधव, प्रा. श्रीकांत तनपुरे,प्रा. भारत मेंगडे, प्रा.वैशाली कुलकर्णी, प्रा. सतीश शिंदे, श्री. ऋषिकेश गणगे यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. या शैक्षणिक सहलीसाठी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर, सौ. चंदाताई गोलेकर, मा. विजयसिंह गोलेकर, महा. प्राचार्य प्रा.डॉ. चंद्रसेन आवारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## चिखलीच्या अखंड हरिनाम सप्ताहाला मनोज जरांगे पाटलांची भेट

गेवराई । प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील चिखली येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ४५ वा भव्य अखंड हरिनाम सप्ताह चालू आहे. सप्ताह दरम्यान मंगळवार दि.२१ जानेवारी रोजी दुपारी मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सदिच्छा भेट देवून संत वामनभाऊ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी सप्ताहाच्या मंडपामध्ये हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. श्री संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराज यांच्या कृपेने श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त गुरुवर्य वै.महादेव महाराज (श्री क्षेत्र संस्थान नारायणगड) यांच्या आशिर्वादाने व ह.भ.प. महंत शिवाजी महाराज (श्री.क्षेत्र संस्थान नारायणगड) यांच्या



शुभहस्ते व ह.भ.प. संभाजी महाराज, मादळमोहीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या चिखली येथील अखंड हरिनाम सप्ताहाला मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सदिच्छा भेट देवून ग्रामस्थांशी संवाद साधला.

# चंपावती महोत्सव ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे- जगताप, मुळूक, गलधर

## उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना महोत्सवाचे निमंत्रण!

बीड, प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षीच्या अफाट यशानंतर जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत यावर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. ही ओळख भविष्यात अबाधित राखण्यासाठी साहजिकच नवं कलाकारांची पिढी समृद्ध होणं गरजेचे आहे.




बालकलाकारांच्या अर्थातच शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देण्याकरीता त्यांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा या उदात्त हेतूने गतवर्षी याहिवर्षी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असून बीड जिल्ह्यातील मराठी/इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे असे कळकळीचे अहवान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी केले आहे. गतवर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला अशा विविध कलेच्या स्पर्धांना एकत्रित करून बीड शहरात जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवासाठी बीड जिल्ह्यातील आकरा तालुक्यातील शेकडो शाळांमधील तब्बल ८४४ बालकलाकार सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा चंपावती महोत्सव पुन्हा एकदा व्हावा अशी इच्छा जिल्ह्याभरातून बालक पालक तथा शाळा शिक्षकांनी व्यक्त करत होते. यामुळे पुन्हा एकदा यावर्षी भव्य दिव्य चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना महोत्सवाचे निमंत्रण!

**महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये दि ०१फेब्रुवारी २०२५ ते दि. ९ फेब्रुवारी २०२५ यादरम्यान संपन्न होणार असलेल्या जिल्हास्तरीय मचंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकफ स्पर्धेचे निमंत्रण उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्याबरोबरच सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट साहेब, जलसंधारण मंत्री संजयजी राठोड साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्निल भैय्या गलधर यांनी भेटून निमंत्रण दिले व बालकलाकारांना प्रोत्साहन देण्याकरिता उपस्थित राहावे अशी विनंती केली.**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



## संपादकीय

## सैफवरील हल्ला, मुंबईकरांना इशारा

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर रात्री २.३० वाजता त्याच्या घरात घुसून चाकूने झालेला हल्ला ही मुंबईकरांना वॉर्निंग बेल आहे. हल्लेखोर तरुणाने सैफवर चाकूचे सपासप सहा वार केले. रक्तबंबाळ अवस्थेत सैफ ऑटोरिक्षातून लीलावती इस्पितळात गेला. तेथील डॉक्टरांनी त्याला वाचवले, त्याच्या मणक्यात घुसलेला चाकूचा तुकडाही बाहेर काढला. त्याच्यावर झालेल्या हल्ल्याने बॉलिवूडला हादरा बसलाच पण मुंबईकरांनाही सावध राहा असा इशारा या घटनेने दिला आहे. मुंबईतील पश्चिम उपनगरातील वांद्रे येथे सद्गुरू शरण या बहुमजली इमारतीत सैफ व त्याचा परिवार अकराव्या आणि बाराव्या मजल्यावर राहतो. आलिशान डुप्लेक्स फ्लॅटमध्ये सैफ, करिना, त्याची मुले तैमूर व जेह राहतात. मुलांना संभाळणाऱ्या आयाही घरातच राहतात. चंदेरी दुनियेत सैफ-करिना ही जोडी जशी सेलिब्रिटी आहे तसेच हा परिवार धनाढ्यही आहे. पण मध्यरात्रीनंतर आपल्या घरात घुसून कोणी आपल्यावर हल्ला करील अशी किंचितही कल्पना या दाम्पत्याने कधी केली नव्हती. सैफ अली खानची आई शर्मिला टागोर एक प्रसिद्ध अभिनेत्री आहे. सैफचे वडील मन्सूर अली पतौडी हे स्टार क्रिकेटपटू होते. नबाब कुटुंबात जन्मलेला सैफ नेहमीच शाही जीवन जगत आला आहे आणि त्याच्या भोवती ग्लॅमरही कायम आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे त्याच्या फ्लॅटमध्ये घुसून हल्ला करणारा बांगलादेशी तरुण आहे. या तरुणाने हल्ला करण्यासाठी सैफ हे टार्गेट का निवडले, तो सैफच्या घरापर्यंत पोहोचलाच कसा, वांद्रे परिसरात उच्चभ्रू वस्ती आहे, हाय प्रोफाईल सोसायटीमध्ये बांगलादेशी हल्लेखोराला प्रवेश मिळाला कसा, त्यामागे कोणी मास्टर माईंड आहे का, सैफवर चाकूचे वार करून तो तेथून पसार कसा झाला, अशा प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. सैफ याच्या आलिशान फ्लॅटमध्ये लायब्ररी, आर्ट वर्क, स्विमींग पूल, मुलांना नर्सरी, थिएटर, सुंदर सजावट केलेले सिंलिग आहे. घरात ऑडी स्पायडर, मर्सिडिज बेंज, रेंज रोव्हर अशा आलिशान मोटारी आहेत. सैफचे आजवर ७५ चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. दिल चहाता है (२००१), कल हो ना हो (२००३), हम तूम (२००४), ओमकारा (२००६) हे त्याचे गाजलेले चित्रपट. करिनाशी लग्न होईपर्यंत सैफ वांद्रे येथील फॉर्च्युन हाईट्समध्ये राहात होता. सैफचे स्विझर्लंडला घर आहे. शिवाय वडिलोपार्जित गुरुग्राम येथे मोठा पॅलेस आहे. आजवर मुंबईत सेलिब्रिटींवर आणि सार्वजनिक जीवनातील आघाडीच्या नेत्यांवर जीवघेणे हल्ले होण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. पण घरात घुसून सैफवर झालेला हल्ला ही अतिशय गंभीर घटना आहेच पण पोलीस, प्रशासनाला आव्हान देणारी बाब आहे. राज्यात सरकार कोणाचे असो, देशात मुंबई हे सर्वात सुरक्षित महानगर म्हणून ओळखले जाते. दिल्ली, कोलकता, बंगळूरु, हैदराबाद, लखनऊ, पाटण्यापेक्षा मुंबई खूपच सुरक्षित आहे. मुंबई हे चोवीस तास धावणारे महानगर आहे. या महानगरात धनाढ्य, गर्भश्रीमंत आहेत आणि लाखोंच्या संख्येने कामगार, कर्मचारी आणि रोजंदारीवर पोट भरणारे आहेत. मुंबई कोणालाही उपाशी ठेवत नाही. रात्री १२ नंतरही एकटी तरुणी या महानगरात लोकल, बस किंवा रिक्षा-टॅक्सीने प्रवास करू शकते. मुंबई महानगराची लोकसंख्या दीड कोटींवर आहे व महामुंबईची लोकसंख्या दोन कोटींवर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येत रोजगार-नोकरी व उद्योग व्यवसायासाठी परप्रांतीयांची संख्या मोठी आहे. मुंबईत हिंदी भाषिकांची संख्या पंचावन्न लाखांपेक्षा जास्त असावी. पाटणा किंवा लखनऊपेक्षा मुंबईत हिंदी भाषिक जास्त आहेत. बाहेरून येणारे लोक कोण आहेत, ते कुठून आले, कुठे राहतात, काय करतात, त्यांचे पोलीस रेकॉर्ड काय आहे याची सविस्तर व अद्ययावत माहिती मुंबई पोलिसांकडे आहे काय? मुंबईत पकडलेल्या गुन्हेगारांमध्ये अन्य भाषिक जास्त सापडतात हे वास्तव आहे. मुंबईतील घुसखोरीवर नियंत्रण आहे का, हा प्रश्न वर्षानुवर्षे कायम आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि महाराष्ट्राची लढून मिळवलेली राजधानी आहे. देशातील सर्वात महागडे शहर म्हणून मुंबई ओळखली जाते. अन्य कोणात्याही शहरापेक्षा रिअल इस्टेटचे दर मुंबईत सर्वात उंचीवर असतात. वांद्रे ते जुहू, अंधेरी, गोरेगाव हा परिसर चंदेरी दुनियेतील कलाकार, निर्माते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आदी चित्रपटसृष्टीतील संबंधितांचे आगार आहे. विविध क्षेत्रांत ग्लॅमर असलेले मुंबईत खूप आहे. व्यापार-उद्योग-व्यवसाय- वित्तीय क्षेत्रातील बडे आसामी मुंबईतच आहेत.

# डोनाल्ड ट्रम्प यांची दुसरी इनिंग; साऱ्या जगाचे लक्ष

अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथ घेतली. जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असल्याची भाकिते वर्तवत असताना, दुसऱ्या इनिंगमध्ये डोनाल्ड ट्रम्प काय निर्णय घेणार याकडे जगाचे लक्ष आहे. गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांचा पराभव करून ट्रम्प यांनी अमेरिकन सत्तेत शानदार पुनरागमन केले. चार वर्षांच्या अंतरानंतर राष्ट्रपती म्हणून शपथ घेणारी ती अमेरिकन इतिहासातील दुसरी व्यक्ती ठरली आहे. जगावर प्रभाव टाकणाऱ्या अमेरिकेची भूमिका हा पुढील काळात निर्णायक ठरणार आहे. अशातच डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर जागतिक शांततेसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगत, तिसरे महायुद्ध टाळणार आहोत, अशी घोषणा करून, एक सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. आतापर्यंत अमेरिकेच्या अध्यक्षीय इतिहासात, एवढ्या कमी कालावधीत जे घडले नाही, ते मी करून दाखविणार आहे, असे सांगून त्यांनी अमेरिकन जनतेच्या आशा पल्लवित केल्या आहेत. अध्यक्ष बनल्यानंतर अमेरिकेच्या नागरिकांना सर्वोत्तम प्रथम दिवस, उत्कृष्ट प्रथम सप्ताह आणि असामान्य प्रथम १०० दिवस देणार आहे. तसेच अमेरिकेत बेकायदा शिरलेल्या घुसखोरांना परत पाठविण्यासाठी इतिहासातील सर्वात मोठे अभियान हाती घेणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. त्यातून अमेरिकेच्या सीमारेषेवरील सुरक्षा भक्कम करण्यावर भर दिला जाईल. सीमा ओलांडून अमेरिकेत प्रवेश करण्यासाठीचे सर्व बेकायदा मार्ग बंद करण्यात येतील, अशा अनेक निर्णयाची अंमलबजावणी कशी होईल याकडे अमेरिकन नागरिकांचे लक्ष असेल. जगाच्या दृष्टिकोनातून ट्रम्प




यांची धोरणे आणि भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आपण सत्तेवर येण्यापूर्वीच इस्रायल आणि हमास यांच्यात युद्धबंदी करार झाला आहे. हा करार होण्यात आपण पुढाकार घेतला होता. जगात युद्ध होऊ नये असे आपले ध्येय असून ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर चीनचे टिकटॉक हे ॲप बंद होणार, अशी शक्यता होती. त्यामुळे शनिवारपासूनच अमेरिकेतल्या स्टोअर्समधून हे ॲप गायब झाले होते. मात्र ते बंद केले जाणार नाही, अशी घोषणा ट्रम्प यांनी भाषणात केल्याने पुन्हा या चिनी कंपनीच्या ॲपची विक्री अमेरिकेत सुरू झाली आहे. शपथविधी सोहळ्यानंतर आजच्या शेअर बाजारातील ट्रेंडबद्दल बोलायचे झाले, तर मंगळवारी जागतिक संकेत संमिश्र दिसले. आशियाई बाजार तेजीने व्यवहार करत असताना, देशातील सेन्सेक्स आणि निफ्टीने अचानक वेग घेतलेला दिसला होता. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकेच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली तरी त्याचे जागतिक बाजारपेठेत सकारात्मक परिणाम भविष्यात दिसून येणार आहेत. त्याचप्रमाणे, गेल्या काही दशकांमध्ये भारत आणि अमेरिकेतील संबंध सातत्याने मजबूत झाले असले तरी, ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात हे संबंध अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीडोनाल्ड ट्रम्प यांच्या मैत्रीपूर्ण संबंधाव्यतिरिक्त, इतर अनेक घटक आहेत ज्यांच्या आधारे दोन्ही देशांतील संबंध सुधारण्याची अपेक्षा आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याचे वरिष्ठ अधिकारी आणि भारतीय वंशाचे रिचर्ड वर्मा यांनी भारत-अमेरिका संबंधांच्या भविष्याबद्दल सकारात्मक भावना व्यक्त केली आहे. दोन्ही देश तंत्रज्ञान आणि बुद्धिमत्ता माहिती सामायिक करतात. तसेच, संयुक्तपणे सर्वात प्रगत प्रणालींचे उत्पादन आणि विकास करतात, याकडे वर्मा यांनी लक्ष वेधले आहे. त्याचाच एक भाग म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात नागरी हक्क, राष्ट्रीय सुरक्षा आणि तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत अनेक भारतीय-अमेरिकन लोकांना नियुक्त केल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी हरमीत कौर ढिल्लन, विवेक रामास्वामी, काश पटेल, जय भट्टाचार्य आणि श्रीराम कृष्णन ही नावे प्रमुख आहेत. जागतिक भारतीय समुदायाची एक नानफा संस्था ‌इंडियास्पोराने डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केले आहे. त्यासोबतच नवीन प्रशासनाअंतर्गत अमेरिका-भारत संबंध अधिक मजबूत होतील अशी आशा व्यक्त केली. दुसरीकडे ट्रम्प यांनी दिलेल्या इशारावजा धमकीमुळे अनेक देशांमध्ये अस्वस्थता आहे. त्याचे कारण, ट्रम्प यांनी सत्तेवर येताच कॅनडा आणि मेक्सिकोवर कर लादण्याची धमकी दिली होती. अमेरिका १ फेब्रुवारीपासून दोन्ही देशांकडून २५ टक्के कर वसूल करणार आहे. ट्रम्प यांच्या या आदेशानंतर या देशात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ट्रम्प यांनी एकाच वेळी ११ देशांत खळबळ माजवली आहे. या ११ देशांच्या यादीत भारत आणि चीनचा समावेश आहे. डिसेंबर २०२४ दरम्यान ब्रिक्स परिषदेतील देशांनी अमेरिकन डॉलरला कमकुवत करण्यासाठी किंवा डॉलरच्या तुलनेत इतर कोणत्याही चलनाला पाठिंबा देण्यासाठी नवीन चलन तयार करण्याचा निर्णय घेतला होता. या नवीन चलनाबाबत पुनर्विचार केला नाही, तर त्या संबंधित त्या सर्व देशांवर १०० टक्के कर लादण्यात येईल आणि त्यांच्यावर बंदी घालण्यात येईल, अशी धमकी ट्रम्प यांनी दिलेली आहे. ट्रम्प यांची ही धमकी खरी ठरली, तर ब्रिक्स देशांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागेल. यामध्ये भारताचाही समावेश आहे, हे विसरून चालणार नाही.

# पहिल्या दिवशीचे गुंतवणूक करार ६,२५,४५७ कोटींवर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्या अनेक कंपन्यांच्या भेटी
## महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी केले निमंत्रित, टाटा समूह ३0,000 कोटी गुंतवणूक करणार
## बीड जिल्ह्यात १५,000 मेवॉ पाईपलाईन आणि पवनऊर्जा प्रकल्पाबाबत झाली चर्चा

दावोस, २२ जानेवारी

दावोस येथील वर्ल्ड इकोनॉमिक फोरमम ध्ये पहिल्या दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६,२५,४५७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले आहेत. एकाच दिवशी इतक्या मोठ्या रकमेचे करार होणे, हा एक नवा विक्रम आहे. दरम्यान आज दुस-या दिवशी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार होणार आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सामंजस्य करारांच्या व्यतिरिक्त अनेक कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केले. टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचीही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. टाटा समूह ३० हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. काल्सबर्ग समूहाचे सीईओ जेकब अरुप अँडरसन यांची त्यांनी भेट घेतली. काल्सबर्ग समूहाने महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा प्रदर्शित केली असून, त्यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

रिटेल क्षेत्रात कार्यरत लुलू समूहाचे प्रबंध संचालक एमए युसुफ अली यांचीही देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. त्यांनी नागपुरात गुंतवणूक करण्याची इच्छा प्रदर्शित केली असून, महाराष्ट्रातही त्यांनी विस्तार करण्याची तयारी दर्शविली आहे.

रिन्यू पॉवरचे अध्यक्ष आणि सीईओ सुमंत सिन्हा यांची देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. बीड जिल्ह्यात १५,००० मेवॉ पाईपलाईन आणि पवनऊर्जा प्रकल्पाबाबत यावेळी चर्चा झाली.

शिंडर इलेक्ट्रीक इंडियाचे प्रबंध संचालक आणि सीईओ दीपक शर्मा यांचीही त्यांनी भेट घेतली. जागतिक बँकेच्या मदतीने राज्यातील आयटीआयच्या सक्षमीकरण कार्यक्रमात तसेच ऊर्जा क्षेत्रात एआयच्या वापराबाबत सहकार्य करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. अहिल्यानगर आणि नाशिक येथे विस्तार करण्याच्या त्यांच्या योजनांचेही सूतोवाच त्यांनी केले.

मास्टरकार्ड, एपीएसीचे अध्यक्ष लाईग हाई यांचीही त्यांनी भेट घेतली. लुईस ड्रेफसचे सीईओ मायकेल ग्लेंची यांच्याशी शेती, अन्नप्रक्रिया,

आंतरराष्ट्रीय शिपिंग आणि वित्तीय क्षेत्राबाबत मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. शेतीच्या क्षेत्रात अधिक सहकार्य वाढविण्यावर यावेळी चर्चा करण्यात आली.

कॉग्निझंटचे सीईओ रविकुमार एस. यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली.

# महायुतीत महाधुसफूस!

नाशिक आणि रायगड जिल्हा पालकमंत्रिपद रद्द करण्याची नामुष्की सरकारवर आणि मुख्यमंत्र्यांवर ओढवणे ही गंभीर बाब आहे. महायुतीला विधानसभा निवडणुकीत राक्षसी बहुमत मिळाले, त्यामुळे महायुतीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांच्या आणि आमदारांच्या महत्त्वाकांक्षांनी सुद्धा राक्षसी रूप धारण केल्याचे स्पष्ट दिसते आहे. आधी मंत्रिमंडळ विस्तार, नंतर खातेवाटप आणि आता पालकमंत्रिपदावरून ही बाब अधिकच स्पष्ट झाली आहे. त्यामुळे सरकारमध्ये सारे काही आलबेल नाही हे निश्चित! मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर सतत चर्चा होती ती पालकमंत्रिपदांची. अखेर एकदाची पालकमंत्रिपदाची यादी जाहीर झाली. यादी पाहून काहींचे चेहरे खुलले तर काहींचे काळवंडले. महायुतीतील घटक पक्षांमध्ये पालकमंत्रिपदावरून तीव्र स्वरूपाची स्पर्धा होती, काही जिल्ह्यांच्या पदांवरून मतभेदही होते. या गोष्टींचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे पालकमंत्री हे पद किती महत्त्वाचे झाले आहे ते लक्षात यावे. अर्थात जिल्ह्याचे पालकमंत्री काय काम करतात हे सांगणे न लगे! कारण त्याचा अनुभव जनतेला पदोपदी आला आहे, येत राहील. अलिकडे पालकमंत्री हे पद दोन कारणांसाठी अधिक चर्चेत आहे. एक म्हणजे झेंडावंदन आणि दुसरे म्हणजे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदारांसोबत होणारी बाचाबाची! मात्र, त्या पलीकडे जाऊन जिल्ह्याच्या विकासात पालकमंत्र्यांचा वाटा हा फार महत्त्वाचा मानला जातो. अनेक मंत्री जिल्ह्यातील राजकीय गणिते आपल्या हाती असावीत यासाठी हे पद आपल्या हाती असावे म्हणून आग्रही असतात. पालकमंत्री हा कॅबिनेटस्तरीय मंत्री असतो जो राज्य सरकारद्वारे राज्यातील विशिष्ट जिल्ह्याच्या विकासावर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त केला जातो. पालकमंत्री जिल्ह्यातील विविध राज्य सरकारी योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतात आणि जिल्ह्याचे प्रशासन कार्यक्षमतेने चालत असल्याची खात्री करतात. पालकमंत्री राज्य सरकार, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. सरकार म्हणून त्या जिल्ह्याची जबाबदारी ही पालकमंत्र्यांची असते. त्या त्या जिल्ह्यात सरकारी योजना, विकासकामे, मोठे प्रकल्प, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर समन्वय राखणे, जिल्ह्यासाठी निधीची तरतूद करण्याची जबाबदारी पालकमंत्र्यांकडे असते. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष हे पालकमंत्री असतात. तसे पाहिल्यास राज्यघटना अथवा सरकारच्या कामकाजाच्या नियमात पालकमंत्रिपदाची तरतूद नाही. हे पद महाराष्ट्रातच प्रथम अस्तित्वात आले. १९७२ नंतर जिल्ह्याचे प्रभारी म्हणून मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली होती, पुढे ही पद्धत तशीच सुरू राहिली. याच दरम्यान ७४व्या घटनादुरुस्तीनुसार प्रत्येक जिल्ह्यात नियोजन समिती असली पाहिजे, अशी तरतूद करण्यात आली. या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून पालकमंत्री नेमला जातो. तेव्हापासून पालकमंत्रिपद अस्तित्वात आले. कालांतराने या पदाची कार्यपद्धती तीच राहिली मात्र, त्याला वेगळे रंग येत गेले. फक्त या निमित्ताने जिल्ह्यातील सत्ता आपल्या हाती असावी आणि त्या भागात होणा-या आर्थिक व्यवहाराची सूत्रे आपल्या ताब्यात राहावीत म्हणून पालकमंत्रिपदावरून वाद होत असतील तर ती दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. पालकमंत्री एवढे प्रभावी का ठरतात, त्यांच्या नेमणुकांसाठी एवढी चढाओढ का होते हे जनतेला न उलगडणारे कोडे राहिलेले नाही. पालकमंत्र्यांकडे राजकीय नेता अथवा पक्षाचे जिल्ह्यावर नियंत्रण वाढवण्याचा एक भाग म्हणून पाहिले जाते. कारण मंत्री हे नागरिकांच्या संपर्कात असणे अभिप्रेत आहे. या पदासाठी मोठ्या प्रमाणावर लॉबिंग होण्याचे कारण काय हे सा-यांनाच ठाऊक आहे. राज्यात होणारी विकासकामे इतक्या निकृष्ट दर्जाची का होतात, या प्रश्नाच्या उत्तरात ते दडले आहे. सध्या महायुतीमध्ये पालकमंत्रिपदावरून मिठाचा खडा पडला आहे. नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाच्या मुद्यावरून शिंदे सेना नाराज असून पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी गेले आहेत. एखादा अटीतटीचा प्रसंग निर्माण झाला की आपला आतला आवाज ऐकण्यासाठी अथवा निर्णय घेण्यासाठी एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी निघून जातात असे अनेक वेळा दिसून आले आहे. महायुतीत समन्वयक म्हणून काम पाहणारे आशिष कुलकर्णी यांना फोन करून पालकमंत्रिपदाबाबतची आपली नाराजी एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली म्हणे. रायगडमध्ये शिवसेनेचे जास्त आमदार असतानाही डावलले गेल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. दादा भुसे हे ज्येष्ठ मंत्री असूनही त्यांना कोणत्याच जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले नाही उलट भाजपच्या नवख्या मंत्र्यांनाही पालकमंत्रिपद दिल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. उपमुख्यमंत्री शिंदे महायुतीवर नाराज असल्यानेच ते दरे गावी गेल्याची चर्चा आहे. त्याबाबतचे स्पष्टीकरण देताना शिंदे म्हणाले, मी माझ्या गावी आलो की माझ्या नाराजीची चर्चा होते, पण मी इथल्या विकासकामासाठी गावी आलो आहे. गोगावले व भुसे यांनी पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवण्यात वावगे काहीच नाही असेही शिंदे म्हणाले. पालकमंत्रिपदावरून महायुतीत खदखदत असलेला असंतोष सोमवारी अधिकच भडकला. मंत्रिमंडळ विस्तारापासून सुरू झालेली धुसफूस पालकमंत्रिपदे जाहीर झाल्यापासून अधिकच वाढली आणि अवघ्या २४ तासांत पालकमंत्रिपदाला स्थगिती देण्याची नामुष्की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ओढवली. त्यामुळे सत्तारूढ महायुतीमधील बेबनाव अधिकच स्पष्ट झाला. आता पालकमंत्री बदलतील, उद्या मंत्री, उपमुख्यमंत्री बदलतील, ही परिस्थिती बघून जनतेलाच या सरकारला बदलावे लागेल अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. तिन्ही पक्षांमध्ये जिल्ह्याच्या विकासापेक्षा जिल्ह्यात मलिदा कोण खाणार याची स्पर्धा सुरू आहे. यातूनच नाराजी समोर येत आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार? उलट लाडक्या बहिणींचे लाभार्थी कमी केले जात आहेत. शेतक-यांच्या कर्जमाफीकडे सरकारचे लक्ष नाही, फक्त एकमेकात वाद घालून महाराष्ट्राला खड्ड्यात घालण्याचे काम सरकार करीत आहे अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मागे २० आमदार आहेत. त्यामुळे सतत वेगवेगळ्या मागण्यांसाठी हट्ट करणारे एकनाथ शिंदे यांना दूर लोटून लवकरच नवीन ‌उदय होईल असा विरोधकांनी गौप्यस्फोट केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस गुंतवणूक परिषदेसाठी दावोसला गेले तेव्हा त्यांनी सोबत उपमुख्यमंत्री शिंदे यांना न नेता उदय सामंत यांना नेले आहे. त्यामुळे नव्या घडामोडी घडतील असे बोलले जात आहे. सध्या महायुतीत आलबेल नाही एवढे मात्र खरे!

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २३ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# ज्येष्ठांचे पहिले मराठी साहित्य संमेलन लातूरला

लातूर । प्रतिनिधी ज्येष्ठ नागरिक संघाचे (फेस्कॉम) राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे याच महिन्यात यशस्वी पद्धतीने पार पडल्यानंतर आता ज्येष्ठांचे पहिले मराठी साहित्य संमेलन लातूर येथेच येत्या ५ फेब्रुवारी रोजी आयोजिण्यात आले. या संमेलनाचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा मराठीतील नामवंत समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे एक दिवसीय साहित्य संमेलन सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली येथील डॉ. भालचंद्र ब्लड बॅन्क सभागृहात संपन्न होईल व सकाळी ८.३० वाजता निघणा-या ग्रंथदिंडीने संमेलनास प्रारंभ होईल, असे संमेलनाचे कार्यवाह प्रकाश घादगिने यांनी सांगितले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील हे असून, प्रमुख अतिथी म्हणून साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे, समतावादी सांस्कृतीक चळवळीचे अध्यक्ष डॉ. माधव गादेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचे अध्यक्ष ॲड. एस. एन. बोडके, साहित्यिक विलास सिंदगीकर, ज्येष्ठ नागरिक संघाच्या लातूर शाखेचे अध्यक्ष अभि. आर. बी. जोशी आणि प्रकाश घादगिने हे उपस्थित राहणार आहेत. संमेलनात ङ्गसमाजाच्या जडणघडणीत ज्येष्ठांचे योगदानफ या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या परिसंवादात वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रदीप नणंदकर, साहित्यिक प्रा. डॉ. राजशेखर सोलापुरे, ज्येष्ठ युरॉलॉजिस्ट डॉ. हंसराज बाहेती, सामाजिक कार्यकर्ते रामानुज रांदड हे सहभागी होणार आहेत. परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. बी. आर. पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तिस-या सत्रात साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक एकनाथ आवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कथाकथन कार्यक्रमात साने गुरुजी बालसाहित्य पुरस्कार प्राप्त लेखिका वृषाली पाटील, कथाकार चंद्रशेखर कलसे, ज्येष्ठ कथाकार जी. जी. कांबळे सहभागी होतील. सूत्रसंचालन डॉ. भास्कर बोरगावकर यांच्याकडे राहील. चौथ्या सत्रात कवी प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कविसंमेलनात सुरेश गीर, रमेश चिल्ले, जयप्रकाश दगडे, हाशम पटेल, सुभद्रा घोरपडे, नरसिंग इंगळे, ॲड. जहिरोद्दीन सय्यद, रामदास कांबळे, कल्याण राऊत, सुनिता बोरगावकर, शालिनी पाटील, रमेश हणमंते, शैलजा कारंडे, तहसीन शेख, मंगला सास्तुरकर, उर्मिला भालके, उषा भोसले, विजया भणगे, डॉ. श्रीपाद ढवळे, देविकुमार पाठक आदी नव्या, जुन्या कवींचा सहभाग आहे. या कविसंमेलनाचे सूत्रसंचलन कवी भारत सातपुते करणार आहेत. संमेलनाध्यक्ष डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखालील समारोप सत्रास प्रसिद्ध विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे , प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, साहित्य संस्कृती मंडळाचे माजी सदस्य धनंजय गुडसुरकर, आर. बी. जोशी, प्रकाश घादगिने हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. समारोपसत्राचे सूत्रसंचालन अभियंता महेंद्र जोशी करतील. साहित्य संमेलनाच्या मेजवानीचा साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन ज्येष्ठ नागरिक संघाने केले आहे.

# ग्रेड चित्रकला परीक्षेत सरस्वती विद्यालय तेलगाव चे घवघवीत यश




तेलगाव । प्रतिनिधी धारूर तालुक्यातील तेलगाव येथील सरस्वती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इंटरमिजिएट व एलिमेंट्री परीक्षा २०२४ परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून यात सरस्वती विद्यालय तेलगाव तालुका धारूर जिल्हा -बीड.या विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा इंटरमिजिएट आणि एलेमेंटरी परीक्षेचा निकाल १००% लागला आहे. शाळेमधून इंटरमिजिएट परीक्षेसाठी १९,विद्यार्थी परीक्षेत बसले होते. इंटरमिजिएट परीक्षेमधून - -ग्रेडमध्ये १५ विद्यार्थी, इ - ग्रेडमध्ये ३ विद्यार्थी, उ - ग्रेडमध्ये १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर एलिमेंटरी परीक्षेसाठी २८ विद्यार्थी बसलेले होते एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत - -ग्रेडमध्ये १५ विद्यार्थी, इ - ग्रेडमध्ये ७ विद्यार्थी, उ - ग्रेडमध्ये ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या दोन्ही परीक्षेत एकूण - ग्रेड मध्ये ३० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष डॉ. दीपाताई क्षीरसागर, डॉ. योगेश भैया क्षीरसागर, डॉ. सारिका ताई क्षीरसागर डॉ. देशमाने सर डॉ. गुट्टे सर शालेय समितीचे अध्यक्ष अशोकरावजी लगड प्राचार्य श्री शिंदे व्ही आर सर, साप्ताहिक जनसामान्याचा विकासनामा वृत्तपत्राचे संपादक बालासाहेब फपाळ,पर्यवेक्षक चवार सर व कलाशिक्षक मोराळे सर व सर्व शिक्षक वृंदांकडून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन करण्यात आल

# विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत विविध व्यावसायिक कौशल्य जतन करणे महत्त्वाचे - प्रो. डॉ.सुधाकर शेंडगे

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २२ जानेवारी २०२५आजच्या काळात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत विविध व्यावसायिक कौशल्य देखील जतन करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवशी विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते अध्यक्षस्थानी भा. शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड तसेच मंचावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या ॲड..डॉ. योगिता होके पाटील, व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रो.




डॉ. सुधाकर शेंडगे म्हणाले की, सध्याचे शिक्षणातील चित्र हे विचित्र असे दिसत आहे. आज-काल विद्यार्थ्यांचा शिक्षणाला जणू काही बाहेरून पाठिंबा असल्याचे जाणवत आहे. शैक्षणिक प्रक्रियेमध्ये ही गोष्ट अत्यंत खेदाची असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. आजच्या विद्यार्थ्याला शिकायचे तर आहे पण वर्गात बसायचे नाही. मग वर्गात न बसता शिक्षण प्रक्रिया कशी पूर्ण करता येईल बरे? तर यासाठीच विद्यापीठाने आजीवन शिक्षण व विस्तार विभाग सुरू केला आहे व या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तसेच त्यांच्यामध्ये असणा-या विविध कौशल्यांचा विकास करण्याचे काम हा विभाग करत असल्याचे ते म्हणाले. सध्याच्या काळामध्ये विद्यार्थ्यांच्याकडे जर विविध कौशल्य असतील तरच तो या जगात टिकेल अन्यथा तो या स्पर्धेतून बाहेर फेकला जाईल. म्हणून स्पर्धेच्या या युगात जर टिकायचे असेल तर विविध कौशल्य शिवाय तरणोपाय नसल्याचेही त्यांनी प्रतिपादित केले. याबरोबरच त्यांनी संत कबीर, बहिणाबाई चौधरी यांच्यासारख्या महान व्यक्तींची उदाहरणे देऊन सामाजिक परिस्थितीचे भान विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. आजचा पालक देखील संकुचित विचाराने गुरफटलेला आहे तो आजूबाजूला न पाहता बाहेरील परिस्थितीची जाणीव न ठेवता आपल्या मुलांना एकम र्गे घडवत आहे. असे न करता त्याचा चौफेर विकास केला तरच तो समाजात टिकेल असे ते म्हणाले.

याप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये असलेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या ॲड.. डॉ. योगिता होके पाटील म्हणाल्या की, आजच्या विद्यार्थ्यांचा विकास हा निरंतर पद्धतीने झाला पाहिजे. करलो दुनिया मुठी में असे म्हणणारे या जगातील विद्यार्थी हे सर्वकेंद्रीत शिक्षण घेऊन पुढे गेले पाहिजेत. आजच्या रिलच्या जगामध्ये वेळ घालवण्यापेक्षा रियल लाइफ विद्यार्थ्यांनी जगण्यास शिकले पाहिजे. या देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून तुम्ही पुढे आले पाहिजेत तरच हा देश विकसित होईल. अहिल्यादेवी होळकर यांनी समाजास जसे आदर्शवत व प्रेरणादायी कार्य केले

# महिला गृहउद्योजकांचे कार्य कौतुकास्पद

लातूर । प्रतिनिधी बचत गटाच्या माध्यमातून एकत्रित येत महिलांनी गृहउद्योगातून एक पाऊस पुढे टाकण्याचे केलेले कार्य कौतुकास्पद असुन या कार्यायातून इतर महिलांना निश्चितपणे प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर गिण्याबाई देशमुख एज्युकेशनल वेल्फेअर सोसायटी व एएलएफ बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला गृहउद्योगांचे प्रदर्शन व विक्रीस विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी दि. २० जानेवारी रोजी सायंकाळी भेट दिली. त्याप्रसंगी त्या महिला गृहउद्योजकांना शुभेच्छा देताना बोलत होत्या. यावेळी डॉ. सारिका देशमुख, शुभदा रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी या प्रदर्शनातील सुमारे ५० स्टॉल्सला सदिच्छा भेट देऊन महिलांनी उत्पादीत विविध गृहउपयोगी वस्तुंची पाहणी केली. या प्रसंगी माजी नगरसेविका रागिणी यादव यांनी प्रास्ताविक मांडत असताना महिला गृहउद्योगाच्या प्रदर्शन व विक्री उपक्रमा मागच्या हेतूची माहिती दिली. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा बोराडेताई, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका स्वयंप्रभा पाटील, माजी नगरसेविका जानव्ही सूर्यवंशी, फॅशन डिझायनर रुपाली अजय बोराडेपाटील यांची उपस्थिती होती. पाहुण्यांचे स्वागत जयश्री भूतेकर, शोभा कोंडेकर, काशीबाई हांडे, दिशा देशमुख, अग्रवालताई, प्राची कुलकर्णी, अनुराधा औसेकर, वर्षा पत्की, प्रितम जाधव, अंजली पाटील, श्रद्धा भोसले, मीरा देशमुख, उळागड्डेताई, शीतलताई, संगीताताई मोरे, अमरजा भोसले, श्रीमती जयशेट्टी, उषा राठोड यांनी केले.



# शेतकरी सन्मान योजनेतील अपात्र शेतकऱ्यांसाठी ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबिर मोहीम सक्षमपणे राबवा-आ. सुरेश धस

कडा । प्रतिनिधी शेतकऱ्यांसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राबवल्या जात आहेत. या शेतकरी हिताच्या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जातोय. मात्र योजनांच्या इ-केवायशी, लँड सिडींग, किंवा आधार दुरुस्ती अशा काही निकषामुळे पात्र शेतकरी देखील अपात्र ठरतात.यामुळे, ज्या शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळायला हवा ते शेतकरी देखील यापासून वंचित रहाता कामा नये यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबिर योजना राबविण्यात येणार आहे. खरे तर,पीएम किसान सन्मान निधी योजना अंतर्गत केंद्र सरकारकडून वार्षिक सहा हजार रुपये आणि नमो शेतकरी योजनेअंतर्गत राज्य सरकारकडून वार्षिक सहा हजार रुपये असे एकूण बारा हजार रुपये राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतात.पण सध्या योजनेच्या नव्या नियमांमुळे या योजनांसाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांचे अर्ज बाद होत असल्याची तक्रार समोर आली आहे. या योजनांसाठी शेतकरी ऑनलाईन अर्ज भरत आहेत. हे अर्ज कृषी विभागाच्या माध्यमातून जमा होतात.नंतर हे अर्ज तालुकास्तरीय समिती कडे जातात आणि पुढे मग जिल्हास्तरीय समितीकडे जातात. जिल्हास्तरीय समितीकडून हे अर्ज राज्यस्तरीय समितीकडे जातात आणि तेथून अर्ज मंजूर होतात. आष्टी विधानसभा मतदारसंघातील बहुतांश शेतकऱ्यांच्या माध्यमातून सादर करण्यात आलेले अर्ज इ -केवायसी, लँड सिडिंग व आधार दुरुस्ती मुळे राज्यस्तरीय समितीकडून शेतकरी सन्मान योजनेचे अर्ज बाद होत असल्याचे उघडकीस आले आहे त्यासाठी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर २०जाने ते २४ जाने पर्यंत विशेष मदत शिबीर आयोजित करण्यात यावे त्या शिबिराचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आ. सुरेश धस यांनी आवाहन केले आहे

### बीड शहरात भगवा सप्ताहनिमित्त कार्यक्रमाचीरेलचेल

# सुरु-रतन गुजर, लक्ष्मण बहिरवाळ

प्रतिनिधी सालाबादप्रमाणे याहीवर्षी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने भगवा सप्ताहाचा कार्यक्रम याही वर्षी मोठ्या उत्साहात सुरु असून त्यानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हा संघटक रतन गुजर आणि शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशाने व संपर्क नेते सुनिल प्रभु, उपनेत्या सुषमा अंधारे आणि संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर यांच्या नियोजनातून शिवसेनेचा भगवा सप्ताह सोमवार दि.२० जानेवारी पासून सुरु असून दि.२३ जानेवारी रोजीपर्यंत वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, खो-खो स्पर्धा, रनिंग स्पर्धा या भगवा सप्ताहामध्ये होणार असून दि.२३ जानेवारी रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या दिवशी या स्पर्धे चे बक्षीस वितरण संध्या.७ वाजण्याच्या सुमारास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, आजी-माजी पदाधिकारी, शिक्षकसेना व अंगीकृत सर्व संघटनांनी या ठिकाणी उपस्थित रहावे असे जिल्हा संघटक रतन गुजर आणि शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांनी पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

# विद्यार्थ्यांनी मानवी हक्काच्या बाबतीत जागरूक राहावे - डॉ. गजानन होन्ना

माजलगाव प्रतिनिधी दिनांक १७ जानेवारी २०२५ भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मानवी हक्क या विषयावर प्रमाणपत्र कोर्सची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर गजानन होन्ना हे होते. स्टाफ सेक्रेटरी डॉ. गंगाधर उषमवार हे होते. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जिजाराम बागल हे होते.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गजानन होन्ना म्हणाले की, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्कांचा अभ्यास केला पाहिजे. हे हक्क समजावून घेऊन सामाजिकीकरण केले पाहिजे. १० डिसेंबर १९४८ ला आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यामुळे




जगातील प्रत्येक माणसाला हक्क प्राप्त झाले. दरवर्षी प्रत्येक देशातील मानवी हक्काच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्क संघटना अहवाल प्रसिद्ध करत असतात. यावरून त्या देशांमध्ये मानवी हक्कांचा दर्जा काय आहे याची माहिती मिळते. जगातील बरीच राष्ट्र स्वत:च्या देशामध्ये मानवी हक्कांचे उल्लंघन करतात परंतु इतर राष्ट्राकडून ते अपेक्षा ठेवत असतात. भारतीय राज्यघटनेमध्ये सात प्रकारचे मूलभूत अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. व या अधिकाराचा वापर स्वतःसाठी व समाजासाठी करून दिला पाहिजे. भारतीय राज्यघटनेने जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत यासाठी विद्यार्थ्यांनी जागरूक राहिले पाहिजे. प्रत्येकाने अधिकाराच्या बाबतीत जर जागृत राहिले तर आपला देश निश्चितच एक महासत्ता म्हणून उद्याला येईल असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जिजाराम बागल म्हणाले की, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासासाठी असे वेगवेगळे उपक्रम घडवले पाहिजेत. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात येणा-या वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती दिली. जगामध्ये आज मानवी हक्कांचा अभ्यास हा महत्त्वपूर्ण आहे म्हणून हा विषय प्रमाणपत्र कोर्स साठी निवडला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिरंजीव उपाडे यांनी केले तर आभार कुमारी वैशाली पांचाळ यांनी केले. यावेळी प्रमाणपत्रासाठी प्रवेश घेतलेली विद्यार्थी उपस्थित होते.

# कै. संतोष देशमुख यांच्या निर्दय हत्येचा नि:पक्षतेपने तपास होण्यासाठी धनंजय मुंडे चा राजीनामा घ्यावा -तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (प्रतिनिधी):-

मस्साजोगचे सरपंच कै संतोष देशमुख यांच्या निर्दयी हत्येतील व्यक्तीसोबत वाल्मीक कराड यांचा थेट संबंध आल्यामुळे आणि या खून प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांचे थेट संबंध असल्यामुळे या हत्याचा निःपक्षपाती तपास होण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला पाहिजे. अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केली आहे.





मानवतेला काळमिा फासणा-या व अख्या देशाला हादरून सोडणा-या कै. संतोष देशमुख यांच्या निर्दयी हत्तेचा तपास हा निष्पक्षपणे होऊन या हत्तेमागे ज्या ज्या आरोपींचा प्रत्यक्ष प्रत्यक्ष हात आहे. त्या सर्वावर कठोर कारवाई होऊन त्यांना फाशीच झाली पाहिजे. अशी मागणी तमाम महाराष्ट्रातील जनतेची असून रोज वेगवेगळ्या ठिकाणी महाराष्ट्रभर मोर्चे निघत आहेत .सध्या हे प्रकरण रोज वेगवेगळी वळण घेत असून अनेक धागेद्वारे तपास यंत्रणांच्या हाती लागत आहेत. काल एक व्हिडिओ समोर आला त्यामध्ये मुख्य आरोपी व वाल्मीक कराड हे एका व्हिडिओमध्ये आहेत यावरून हे लक्षात येते की यांचा एकमेकांशी थेट संबंध असून याच अनुषंगाने वाल्मीक कराड यांच्यासोबत थेट धनंजय मुंडे यांचे अतिदाट संबंध आहेत सरकारमध्ये मंत्री म्हणून धनंजय मुंडे सामील असल्यामुळे तपासात अनेक अडचणी दबाव येऊ शकतो. यामुळे या प्रकरणाची निःपक्षपाती चौकशी होण्यासाठी तमाम महाराष्ट्रातल्या जनतेची जनभावना लक्षात घेऊन मंत्री धनंजय मुंडे यांनी नैतिकता असेल तर स्वतःच राजीनामा देऊन बाजूला व्हावं किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी तात्काळ त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी अशी मागणी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे. व्यवहार व अनेक उद्योगात यांची संयुक्त भागीदारी असल्याचेही सिद्ध झाले आहे. त्यामुळे त्यांचा राजीनामा जोपर्यंत होत नाही. तोपर्यंत संतोष देशमुख हत्या प्रकरणात निपक्ष व पारदर्शकपणे चौकशी होणार नाही. ही त्रिवार सत्य आहे.

## आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांना अज्ञात व्यक्तीकडून जीवे मारण्याची धमकी



माजलगाव प्रतिनिधी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांना अज्ञात व्यक्तीकडून भ्रमणधनीद्वारे जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.सविस्तर माहिती अशी की दि. २१/०१/२०२५ रोजी राजेश घोडे रा. शिवाजी महाराज चौक माजलगाव जि.बीड येथील रहीवाशी आसुन आज दिनांक २१/१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.१४ मिनि ते आपल्या कार्यालयात बसलेले असताना त्यांना अज्ञात नंबर वरून आज्ञात व्यक्तीने अश्लिल भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार माझ्या जिवितास धोका आहे मी सामाजिक काम करत असल्यामुळे कोणी तरी विकृत मानसिकता असलेली व्यक्ती माझ्या वरती डोळा ठेवुन आहे. हे आसे प्रकार कोण का ? करत आहे हे मला पण माहीत नाही..... या नंबर वरून पुरूष व्यक्ती बोलली आहे तरी मला जिवीतास याच्या कडुन धोका आहे .त्या विकृत मानसिकता आसलेल्या व्यक्तीवर योग्य ती कार्यावही करावी, अशा आशयाची तक्रार क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांनी माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे दिली आहे.

# देशमुख कुटुंबाचा अपमान होईल अशी भूमिका फडणवीसांनी घेऊ नये, -मनोज जरांगे पाटील

### नाहीतर आम्ही राज्य बंद पाडू, असाइशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला

बीड । प्रतिनिधी जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. पोलिसांची पथकांनी महाराष्ट्राच्या शेजारील राज्यात त्याचा शोध सुरू केला आहे. पण, अजूनही त्याचा पत्ता लागलेला नाही. यामुळे आता पोलिसांनी कृष्णा आंधळे यांला वान्टेड घोषित केले आहे. तर दुसरीकडे वाल्मीक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. बीड प्रकरणावरून मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील पहिल्या दिवसापासून आक्रमक झाले आहेत. बीड प्रकरणावरून पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांनी महायुती सरकावर टीका केली आहे. मीडियाशी



बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, खून करणाऱ्या आणि खंडणी मागणाऱ्यांपेक्षा सामूहिक कट रचणारा सगळ्यात मोठा गुन्हेगार आहे. देशमुख कुटुंब तुमच्या घरी आले, त्या कुटुंबाचा अपमान होईल, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊ नये. या प्रकरणातील एक आरोपी जरी सुटला तरी देशमुख कुटुंबाच्या जीवाला धोका आहे. न्यायदेवता न्याय करेल आणि आरोपींना फासावर लटकवेल, अशी अपेक्षा मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. दरम्यान, पोलीस अधिकाऱ्यांना देखील सहआरोपी केले पाहिजे. सांभाळणाऱ्यांना सहआरोपी करत नाहीत. सरकार यांना पाठीशी घालत आहे का? मुख्यमंत्री, एसआयटी, सीआयडी, आणि पोलिस प्रशासनाकडून एक आशा आहे ते एकाही आरोपी सुटू देणार नाहीत. या गुंडाचे राज्यात खूप मोठे नेटवर्क आहे. राज्यात खूप मोठी साखळी आहे, ते संपूर्ण बाहेर काढून त्यांना अटक करायला हवी. हे मुख्यमंत्री करतीलच. नाहीतर आम्ही राज्य बंद पाडू, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

### गुंडाच्या टोळ्या चालवणाऱ्यांना पाठीशी घालणार असाल तर हा महाराष्ट्राला कलंक

गुंडाच्या टोळ्या चालवणाऱ्यांना पाठीशी घालणार असाल तर हा महाराष्ट्राला कलंक आहे. मुख्यमंत्र्यांच्या शब्दावर मराठा समाज शांत आहे. मुख्यमंत्र्यांना आपले कुटुंब म्हणून देशमुख कुटुंबाकडे पाहावे लागणार आहे. तुम्ही जर एखाद्या आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्राची जनता शांत बसणार नाही. मी संतोष देशमुख यांना न्याय मागतो तर मी जातीयवादी आहे का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# बनावट चलनी नोटांमध्ये मनिष क्षीरसागर यास अटक

आठवले गँग सोबत सावलीसारखा राहणारा मनीष क्षिरसागर यांच्या घरामध्ये तीन महिन्यापूर्वी बनावट चलनी नोटांचा कारखाना मिळून आला होता. यामध्ये बीड शहर पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत यातील प्रिंटर, बनावट चलनी नोटा, आणि सहभागी प्रमुख आरोपी तात्काळ अटक केली होते. परंतु यातील प्रमुख आरोपी मनिष क्षीरसागर हा पोलिसांना तेव्हापासून गुंगारा देत होता. परंतु बार्शी नाक्यावरील



डोंगरे कुटुंबावरील खुनी हल्ल्यामध्ये पुन्हा मनीष क्षीरसागर याचा सहभाग निश्चित झाला आणि स्थानिक गुन्हे शाखेने त्याला पुणे येथून उचलले. परंतु पुणे येथे अशा प्रकारच्या बनावट चलनी नोटांमध्ये सहभागी असलेल्या मनीष क्षीरसागर याच्यासोबत अक्षय आठवले आणि ओंकार सवाई हे सुद्धा सोबत मिळून आले होते. तेव्हाच बीड शहर पोलिसांनी बनावट चलनी नोटांच्या गुन्हे तपासा संदर्भात सावध होऊन त्या दिशेने तपास करण्यात सुरुवात केली होती. यावरून आयत्या तावडीत सापडलेल्या मणिष क्षीरसागर याचा कोर्टामार्फत बीड शहर पोलिसांनी जेलमधून त्यांचा ताबा घेतला. पोलिसांच्या तावडीत सापडल्यावर मनीष क्षीरसागर याने पोलिसांना सर्व माहिती दिली. अक्षय आठवले यांनी बनावट चलनी नोटा चलनात आणण्यासाठी पुणे येथे असलेल्या प्रविण गायकवाड यास पिस्टल पुरवले होते. तसेच पळून जाताना मनीष क्षीरसागर याला सोबत घेऊन जाऊन औरंगाबाद येथे लपवले होते. तसेच सनी आठवले यांनी सुद्धा यातील

## १००% टक्के अंधत्व असलेल्या रुग्णाची पत्रकार शेख हमीद यांच्या पुढाकाराणे झाले मोठ्या गाठीचे ऑपरेशन

### रुग्णाच्या नातेवाईकांनी पत्रकार शेख हामीद यांचे मानले आभार



मजालगाव / प्रतिनिधी लोकसेवा संकल्प सा. प्रतिष्ठान चे संवस्थापक अध्यक्ष व दै. सूर्योदय वृतपत्राचे प्रतिनिधी शेख हमीद हे नेहमी समाज सेवा करण्या मधे आग्रेसर असतात व समाजसेवेत अग्रेसर असणारे दोन-चार दिवसापासून ते बीड जिल्हा रुग्णालय येथे आपल्या नातेवाईकाच्या उपचारासाठी चार ते पाच दिवस बीडला मुक्कामी राहत असताना. दिनांक २१/०१/२०२४ रोजी (४) नं. वार्डमध्ये एका रुग्णाजवळ सहज बसुन त्यांना विचार पूस केली तर रुग्णाच्या नातेवाईकाने सांगितले की, गौतम कल्याण गायकवाड रा.मादळमोही ता.गेवराई जी.बीड हे माझे भाऊ आहेत त्यांच्या अवघड जागेवरच्या गाठिचे ऑपरेशनकरण्यासाठी आम्ही मादळमोही येथून बीड जिल्हा रुग्णालय येथे आणले आणि विशेष म्हणजे त्यांना १००%टक्के अंधत्व आहे. ऑपरेशन लवकरात लवकर होऊन आम्ही घरी जावे असे आम्हाला वाटते.त्याच वेळी शेख हमीद यांनी आपली माणुसकी दाखवत आपल्या जवळच्या नातेवाईकाला सोडून त्यांनी संबंधित पेशंटला आपले नातेवाईक समजून त्वरित डॉ. राऊत यांच्याशी संपर्क व चर्चा करुन विनंती केली आणि दुस-याच दिवशी ऑपरेशन करुन घेतले. व इथेच न थांबता त्यांची सुट्टी होई पर्यंत जेवणाची सुद्धा सोय करुन दिली. यामुळे बीड जिल्ह्यात व महाराष्ट्रात पत्रकाराबद्दल अनेक टिपणी होतात की पत्रकार हा फक्त लेखणीतून किंवा आपल्या वर्तमानपत्रातून बातम्या द्वारे समाजाला न्याय देतो परंतु आज हे सुद्धा सिद्ध झाले की ग्राउंड लेव्हलवर राहून पत्रकारिता करता येते हे मात्र शेख हमीद यांनी करून दाखवले त्यामुळेगायकवाड कुटुंबासह नातेवाईकांनी समाजसेवक व पत्रकार हमीद शेख यांचे आभार व्यक्त केले.

## बाजीराव पाटील विद्यालयाचे चित्रकला परिक्षेत यश

बीड । प्रतिनिधी जांब.महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयफ्मुंबई यांच्या मार्फत,एलिमेंटरी व एंटरमिजीएट या शासकीय चित्रकला ग्रेड परिक्षा सप्टेंबर २०२४ मध्ये घेण्यात आल्या होत्या या दोन्ही परिक्षेचा निकाल घोषीत झाला असून या चित्रकला परिक्षेत बाजीराव पाटील विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे एलेमेंटरी परीक्षेला १५ व इंटरमिजीएटला ६ असे एकूण २१ विद्यार्थी प्रविष्ठ होते.सर्वच्या सर्व विद्यार्थी उर्त्तीर्ण झाले आहेत विशेषतः १)जायभाये सार्थक जयदत्त २) जायभाये संग्राम जयदत्त हे दोन विद्यार्थी अ ग्रेड प्रथम श्रेणीमध्ये उर्त्तीर्ण झाले आहेत ३) सोनवणे यश मनोहर हा विद्यार्थी बश्रेणीत उर्त्तीर्ण झाला तर उर्वरीत सर्व विद्यार्थी १) अक्षरा परमेश्वर सातपुते २) अल्फीया निजाम शेख,३)हिना ख्वाँजा शेख,४) इफत अस्लम शेख ५)जोया इकबाल पठाण ६)पायल अरूण नागरगोजे ७)सारा अजीम शेख ८) शैला पोपट सानप ९)सोहम दत्ता मस्के १०) जेजस्विनी खाडे ११)वेदांत गणेश खोपडे १२)अविद्या विठ्ठल खोपडे १३)मोहिनी बप्पासाहेब सोनसाळे १४) रागिणी अशोक सातपुते १५)रोहिणी सोनसाळे १६)सना शेख १७)सिमरन शेख या विद्यार्थ्यांना क श्रेणी मिळाली आहे.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री खाडे सर कला शिक्षक श्री जायभाये सर यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे व विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे.विद्यालयाच्या या यशामुळे संस्थेचे सचिव श्री भागवत जिजा आघाव व संस्थेचे अध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. दत्ताजय आघाव साहेब व मार्गदर्शक पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रदीप आघाव,व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी उर्त्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

## स्वच्छतेचे तीन् तेरा शिवसंग्राम महिला आघाडी आदोलनाच्या पाविञ्यात

बीड । प्रतिनिधी अनियमितपणे येणाऱ्या घंटागाडीमुळे शिंदे नगर परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिक परिसरातील मोकळ्या जागेतच कचऱ्याची विल्हेवाट लावतात. त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. यासह नियमित पाणीपुरवठा या समस्येकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी काल शिवसंग्रामच्या महिला आघाडी शहर उपाध्यक्षा संगीताताई ठोसर यांनी मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील अंबिका चौक ते शिंदे नगर फेज २ या परिसरात घंटागाडी नियमितपणे येत नाही. त्यामुळे जमा झालेला कचरा नागरिक आजूबाजूच्या परिसरात टाकतात. शिवाय या मार्गावर शाळा,मॉल,मंगल कार्यालये,बँका, व्यापारी संकुल असल्यामुळे रहदारी व वर्दळ जास्त प्रमाणात आहे. यातच रस्त्यावरील कचरा तसाच साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे.शिंदे नगर फेज २ परिसरात असलेल्या मोकळ्या भूखंडांचा वापरही कचरा कुंडी म्हणूनच होत आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात उग्र स्वरूपाचा वास आणि दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डासांचे प्रमाणदेखील वाढले आहे. दुसरीकडे शहरात डेंग्यूसारख्या रोगाची साथ सुरू आहे. यामुळे लहान मुले तेथेच खेळतात, त्यामुळे आबालवृद्धाचे आरोग्यदेखील धोक्यात येत आहे.या संदर्भात महिला आघाडी शिवसंग्रामच्या शहर उपाध्यक्षा संगीताताई ठोसर यांच्या नेतृत्वात प्रभाग क्रमांक एक मधील महिलांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदन देऊन त्वरित नियमित पाणीपुरवठा व नियमित घंटागाडीचे नियोजन करावे अशी विनंती केली. याप्रसंगी दुर्गा बाबासाहेब तुंबड,वर्षा गणेश बेद्रे, राधा श्याम बेदरे, रोहिणी सखाराम होंडे, सृष्टी विजय कुडके, आशा रामेश्वर राठोड, रूपाली निलेश शेटे, सुचिता निखिल शेटे,कोमल रामदास गवते, गीता निलेश ज्ञाने,गिरीजाबाई पांडुरंग विद्यागर, संध्या लांगोरे यांच्यासह परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या. शिंदे नगर फेज २ येथे पाईपलाईन पडून वर्ष झाले तरी अजून नियमित पाणीपुरवठा होत नाही. या हद्दवाढ भागात तर नगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.शहरीकरणाच्या कुठल्याच सुविधा मिळत नाहीत.त्यामुळे आम्ही बीड नगरपालिका हद्दीत राहतो, सर्व कर भरतो मग सोयी सुविधांमध्ये दुजाभाव का केला जातो. आमच्यासाठी वेगळा न्याय असं का,असा प्रश्न येथील सामान्य नागरिक विचारत आहेत. शहरातील कचरा संकलनाच्या काम नगरपालिकेने खाजगी कंपनीला दिले आहे.सध्या हे काम कंत्राटदाराने पैसे न मिळाल्याने बंद केले आहे. परंतु पुढील काळात हे काम अधिक चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी तक्रार निवारण केंद्राची स्थापना केली जावी.या ठिकाणी कचऱ्यासंबंधीच्या तक्रारी दाखल करून घेतल्या जाव्यात.यामध्ये घंटागाडी वेळेवर येत नाही, घंटागाडी आलीच नाही, कचरा पडून आहे,अशा स्वरुपाच्या तक्रारींचा समावेश असावा.

# आ.सुरेश धस यांचा आदेश, अन् प्रशासन गावच्या पारावर

आष्टी । प्रतिनिधी आष्टी,पाटोदा, शिरूर मतदार संघातील शेतकरी बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिरे आयोजित करण्याच्या प्रशासनाला दमदार आमदार मा.सुरेश धस यांनी आदेश देताच आष्टी तालुक्यातील तहसीलदार,तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना दिलेल्या सुचनेनुसार पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेतील अपात्रते संबंधी असणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून गावोगावी नेमून दिलेल्या तारखांना गावच्या पारावर शिबीरे घेतली जात आहेत. विधानसभा निवडणुकीमध्ये भरघोस मताधिक्य घेऊन निवडून आलेल्या आणि सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या आ.सुरेश धस यांनी मतदारसंघातील विकास कामासह प्रशासनातील सर्वसामान्याला येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनातील सर्व अधिकारी



कर्मचाऱ्यांना त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी गावोगावी पारावर जाऊन सोडवाव्यात असे आदेश दिल्याने गावातील पारावर प्रशासनातील तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे व गटविकास अधिकारी सचिन सानप यांनी विशेष मदत शिबिरे घेऊन पी.एम.किसान लाभार्थ्यांची ई-केवायसी नसणे,लँड सिंडींग नसणे, लाभार्थी अनट्रेसेबल असणे व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता या कॅम्पच्या माध्यमातून अपात्रते संबंधित असणाऱ्या अडचणी सोडवल्या आहेत. आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघात प्रशासनामार्फत विशेष मदत शिबिरे दि.२० ते २४ जानेवारीपर्यंत राबवले जाणार असून या कालावधीत प्रशासन शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,केंद्र शासन व नमो किसान सन्मान योजनेत अपात्र व या संदर्भात असणाऱ्या अडचणीचे निरसन करण्याचे काम करत आहे. या मदत शिबिरात शेतकऱ्यांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद असून या अभिनव उपक्रमाचे शेतकऱ्यांकडून आम दार सुरेश धस यांनी गावोगावी आयोजित केलेल्या शिबिरांमध्ये समस्या सुटल्या बद्दल शेतकरी नागरिकांनी समाधान व्यक्त करून आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.आभार मानले जात आहेत. दिलेल्या कालावधीमध्ये नमो किसान योजनेअंतर्गत वंचित असलेल्या शेतकऱ्यांनी या या ग्रामपंचायत स्तरीय विशेष मदत शिबिराचा लाभ घेण्याचे व आपल्या समस्या सोडण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com